Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# करोना महामारीसारख्या आपत्तींचे व्यवस्थापन व समाजकार्य आंतरनिरसन

**डॉ. अनिल आनंद सरगर**
सहयोगी प्राध्यापक,
बी.पी.नॅशनल इन्स्टिटयुट ऑफ सोशल वर्क,
नागपूर
भ्रमणध्वनी– 8421936342
ईमेल–**anilsargar01@gmail.com**

**प्रस्तावना :**

वर्तमान युग हे माहिती व तंत्रज्ञानाचे मानले जाते. एकीकडे मानवाचे पाऊल परग्रह पादाक्रांत करण्यासाठी सरसावले आहे आणि दुसऱ्या बाजुने भुतलावर एखाद्या ग्रामीण भागात रहदारीसाठी रस्ता नाही, पिण्याचे पाणी नाही किंवा लांकाचे जगणे कठीण झालेले आहे असे विदारक चित्र पहायला मिळते. निसर्गतः प्राप्त झालेल्या बुध्दीचा वापर करून मानवाने आपले जीवन आरामदायी व सुरक्षीत जगता यावे म्हणून नानाविध शोध लावले व प्रगतीचे एकएक टप्पे गाठायला सुरुवात केली. प्रगतीच्या या प्रवासात माणूस केवळ पृथ्वीच्याच कानाकोपऱ्यात नव्हे तर दुसऱ्या ग्रहांवरही पोहचला. आपल्या प्रचंड बुध्दिमत्तेचा वापर करून प्रतिसृष्टी निर्माण करण्याप्रत प्रगतीचे टप्पे गाठुनही मानवाला आज अनेक नैसर्गिक व काही मानवनिर्मित आपत्तींनी ग्रासलेले आहे.

एखादा रोग जगातील विविध भागांमध्ये व्यक्ती–व्यक्ती पातळीवर सहजरित्या पसरु लागतो तेव्हा जागतिक साथ पसरल्याचे म्हटले जाते. चीनमध्ये मागिल वर्षी वुहान शहरातून हा विषाणू तयार झाला आणि थाईलँड, दक्षिण कोरिया, जापान, ताईवान, मकाऊ, हाँगकाँग, संयुक्त राज्य अमेरिका, सिंगापूर, व्हियेतनाम, भारत, ईरान,इराक, इटली, कतार, दुबई , कुवेत आणि अन्य 160 देशांमध्ये नागरिकांना लागण झाल्याची पृष्टी झालेली आहे.[1] आता पर्यंत एकटया भारतामध्ये सुमारे 10626200 लोकांना याची लागण झाली असून या आजारामुळे जवळपास 1 लाख 53 हजार 67 लोकांचा बळी गेला. ही जगातील दुसऱ्या क्रमांकाची आकडेवारी आहे. [3] लागण झालेल्या लोकांमध्ये सुमारे दोन टक्के मृत्यूदर असल्याचे अदांज आहे.[2] या विषाणूला आळा घलण्यासाठी जागतिक स्तरावर सर्व प्रयत्न सुरु आहेत परंतु अजुनही ही साथ पुर्णतः नियंत्रणात आलेली नाही. करोना व्हायरसपासून बचावासाठी आपण पुरेशी काळजी घेत असलो तरी शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक व सर्वच बाजुने प्रचंड नुकसान झालेले आहे. लोकांना कामाशिवाय घरी बसणे सक्तीचे झाले. विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबले. हजारो लोकांचा रोजगार गेला.

आपणा सर्वांना ठाऊकच आहे की आधुनिक तंत्रज्ञानामुळे शास्त्रशुध्दरित्या अभ्यास करून संकटाचे क्षेत्र, तिव्रता आणि सातत्यता यांचा निरिक्षणाव्दारे पुर्व अंदाज घेता येऊ शकते अशा माध्यमांनी प्राप्त झालेल्या घोक्यांच्या सुचना इतरांपर्यंत पोहचविण्याचे कार्य आपण सहजपणे करू शकतो. जेणेकरून सर्वांना आपत्तीची थोडी फार कल्पना मिळाल्याने ते सावध होऊन होणारे अतोनात नुकसान किंवा प्रसंगी होणारी अपरिमित हानी कमी करता येऊ शकते अथवा टाळताही येते. त्याकरिता येणाऱ्या आपत्तीला टाळण्यासाठी अथवा प्रसंगी होणारे नुकसान कमी करण्यासाठी आणि आपत्तीला तोंड देण्यासाठी पुरेसे नियोजनही करता येऊ शकते. यामुळे इतरांना मदत करण्याची आणि समाज ऋण फेडण्याचीही संधी आपल्याला प्राप्त होऊ शकते, हे आपले कर्तव्यही ठरते.

आपत्तीचा अर्थः

संयुक्त राष्ट्रसंघाने ‘आपत्ती म्हणजे अशी घटना की, ज्यामुळे अगदी आकस्मिकपणे प्रचंड जिवीत किंवा अन्य प्रकारची हानी संभवते’ अशी आपत्तीची परिभाषा केलेली आहे. यामध्ये आकस्मिक, प्रचंड आणि हानी हे शब्द आपत्तीची महत्वपुर्ण वैशिष्टये सांगतात. आपत्ती अचानकपणे येत असल्याने आणि ती टाळता येणे कठीण असल्याने त्यामुळे प्रचंड नुकसान होते आणि ते भरून काढणे सहजशक्य होत नाही. करोना हि आपत्तीही अशीच आहे. जी आकस्मिकपणे उद्भवलेली असून त्यामुळे आतापर्यंत प्रचंड जिवीत आणि आर्थिक हानी झालेली आहे. जशी आतापर्यंत आलेल्या पूर, भुकंप, भुस्खलन, रस्त्यावरील अपघात, लागलेल्या आगीत, चक्रवात, त्सुनामी, रेल्वे किंवा अन्यत्र होणाऱ्या बॉम्बस्फोटात तसेच रासायनिक अपघातात आणि आतंकवादी कारवायात अथवा तत्सम छोटया मोठया घटनांमध्ये झालेल्या जिवीत आणि वित्तीय हानी सारखीच आहे.

आपत्ती व्यवस्थापनात खालील चार पायऱ्यांचा वापर केला जातो.

एक. अशा घटनांना प्रतिबंध दोन.अशा घटनांपासून बचाव तिन. अशा घटनांमुळे झालेल्या दुःखांचे शमन आणि चार. बळी ठरलेल्या व पिडीतांचे पुनर्वसन

समाजकार्य ही एक अशी व्यवसायिक सेवा आहे ज्यामध्ये शास्त्रीय पध्दतीचा वापर करून समस्यांचे निदान केले जाते तसेच व्यावसायिक ज्ञान, कौशल्ये,दृष्टिकोन आणि मुल्यांचा वापर करून समस्याचे निराकरण पध्दतशीरपणे केले जाते.

करोना महामारी ही सुध्दा सध्याच्या स्थितीत जगावर आलेली एक मोठी आपत्ती असून या आपत्तीला तोंड देण्यासाठी समाजकार्याची भुमिका अत्यंत महत्वपुर्ण ठरू शकते. कारण या महामारीला तोंड देण्यासाठी योजनाबध्द डावपेचांचा व कार्यनीतीचा योग्य वापर करून तसेच तांत्रिकदृष्टया परिपुर्ण अशा कार्यपध्दतींचा वापर करून कार्य करण्याची आवश्यकता आहे. सामान्यपणे सामाजिक कार्यकर्ता करोना महामारीमध्ये तीन टप्प्यांमध्ये कार्य करू शकतो.

एक. करोना महामारी सारख्या आपत्ती पुर्व काळात

दोन. करोना महामारीच्या काळात

तिन. करोना महामारीच्या नंतरच्या काळात

करोना महामारी सारख्या आपत्ती पुर्व काळात सामाजिक कार्यकर्ता खालील बाबतीत मदत करू शकतो.

1. करोना महामारी सारख्या विविध आपत्तीची लोकांना अभ्यासपुर्ण माहिती देणे.
2. करोना महामारी सारख्या विविध आपत्तीं प्रसंगी घ्यावयाच्या काळजीसंदर्भात लोकांना प्रशिक्षण देणे.
3. करोना महामारी सारख्या विविध आपत्तीं प्रसंगात मदत करणाऱ्या संस्था आणि संघटनांची माहिती, पत्ते, संपर्कासाठी आवश्यक दुरध्वनी क्रमांक व मदत मिळविण्याच्या पध्दतीबाबत लोकांना जागरूक करणे.
4. करोना महामारी सारख्या विविध आपत्तींबाबत लोकांना संवेदनशील आणि जागरूक बनविणे.
5. करोना महामारी सारख्या विविध आपत्तींबाबत व्यवस्थापन करणाऱ्या संस्थांच्या भेटीची व्यवस्था करणे.
6. करोना महामारी सारख्या विविध आपत्तीं व्यवस्थापन करणाऱ्या संस्थां जसे, आरोग्य संस्था, दवाखाने, पोलीस नियंत्रण कक्ष, रेल्वे नियंत्रण कक्ष, नागरी संविधा नियंत्रण कक्ष, विविध सामाजिक, शासकीय व मानवाधिकाराबाबत कार्य करणाऱ्या संस्था व व्यक्तींचे कार्यजाळे स्थापन करणे ज्यांचा महामारी वा तत्सम प्रसंगी वापर करता येईल.
7. विविध माध्यमे आणि समाज काध्यमांचा वापर करून लोकांपर्यंत महामारी वा आपत्तींच्या बातम्या, माहिती आणि सुचना पोहचविणे तसेच व्यवस्था आणि लोक यामधिल कडी बनणे, सभा घेणे, लोकांशी चर्चा करणे इत्यादी कार्य करता येऊ शकते.

करोना महामारी सारख्या आपत्तीच्या काळात सामाजिक कार्यकर्ता खालील बाबतीत मदत करू शकतो.

1. करोना महामारी सारख्या आपत्तींमध्ये दुर्बल मानवी घटकांना वाचविणे. त्यांच्या प्रथमोपचारासाठी आणि वैद्यकीय मदतीसाठी कार्य करणे
2. स्थलांतरित व अन्य गरजु नागरिकांसाठी अन्न, पिण्याचे पाणि, औषधे, कपडे, तात्पुरता निवास इत्यादींची व्यवस्था करणे. सुरक्षित स्थळी पोहण्यासाठी योग्य प्रवासाची सोय करणे.
3. करोना महामारी सारख्या आजारांने ग्रस्त झालेल्यांची मोफत तपासणी करणे, औषधोपचार करणे, योग्य सल्ला व मार्गदर्शन देणे.

4. करोना महामारी सारख्या आजारांमध्ये मृत पावलेल्या दुर्दैवी नागरिकांच्या शवांचा सन्मानजनक अंतिम संस्कार करण्याची व्यवस्था करणे. नातेवाईकांचे सांत्वन करणे, योग्य व सुरक्षित संपर्क आणि भेटीची व्यवस्था करणे
5. करोना महामारी सारख्या आपत्तींमध्ये नियंत्रण कक्ष आणि लोकांमध्ये मध्यस्थांची भुमिका पार पाडणे इत्यादी कार्य करता येऊ शकते.
6. करोना महामारी सारख्या आपत्ती निवारणासाठी योग्य प्रमाणात सर्व सुविधांनी युक्त दवाखाने, रक्तपेढ्या, भोजन व्यवस्था, औषधी पुरवठा करणाऱ्या संस्थांची मदत प्राप्त होण्यासाठी त्यांचा शोध घेणे व गरजुंपर्यंत व्यवस्था पोहचविण्यासाठी मदत करणे.
7. मदत करणाऱ्यांच्या संघटना बांधणे व त्यांच्या कार्यात समन्वय ठेवणे.
8. मास्क वापरणे, वैयक्तीक स्वच्छता ठेवणे, सुरक्षित अंतर राखणे आणि वापरलेल्या मास्कची व कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी कार्य करणे.
9. करोना महामारी सारख्या आपत्तींमध्ये व्यवस्था व लोकांमधिल संघर्ष हाताळणे. सार्वजनिक संपत्तीचे संरक्षण करणे.
10. करोना महामारी सारख्या आजारांची भिती व व्यवस्थापनामधिल संभ्रम दुर करणे.

करोना महामारी सारख्या आपत्ती नंतरच्या काळात सामाजिक कार्यकर्ता खालील बाबतीत मदत करू शकतो.

1. करोना महामारीचा नागरिकांवर झालेल्या विविध परिणामांचा अभ्यास करणे आणि त्यापासून झालेल्या वेगवेगळ्या नुकसानीचा अंदाज घेणे.
2. करोना महामारीमुळे विस्थापित आणि स्थलांतरित झालेल्या लोकांसाठी रोजगार प्राप्ती, आश्रय आणि आवश्यक सुविधांची व्यवस्था करणे.
3. करोना महामारीतील मदत कार्य आणि सेवा प्राप्ती सुलभ करणे.
4. करोना महामारीतील अफवांवर, लोकांच्या वर्तनावर व गर्दीवर नियंत्रण ठेवणे.
5. वैद्यकीय मदत, लसीकरण आणि मानसोपचारासाठी शिबीरांचे आयोजन करणे.
6. महामारी ग्रस्तांना सावरण्यासाठी धिर देणे, निर्माण झालेले तणाव व दुःखासाठी योग्य समुपदेशन करणे.
7. महामारीमुळे झालेल्या नुकसानीचा अभ्यास करून त्याचे अहवाल तयार करणे आणि नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी मदत करणे.
8. व्यवस्थेचे बळी ठरलेल्या लोकांसाठी कायदेशिर लाभासाठी त्यांची बाजू मांडणे.
9. करोना महामारीमुळे विस्कळीत झालेले जनजीवन पुन्हा बहाल होण्यासाठी सर्वांगिन प्रयत्न करणे.

समाजकार्य व्यावसायिकांनी लोकांना मदत करण्याविषयीचे व्यावसायिक ज्ञान, कौशल्ये, तंत्रे आत्मसात केलेली असतात. लोकांना मदत करण्याविषयी त्यांचा दृष्टिकोन मुल्यात्मक आणि प्रगल्भ असतो. त्यामुळे त्यांच्यातील या गुणांचा आणि क्षमतांचा योग्य वापर करून करोना महामारी सारख्या समस्यांचे निराकरण पध्दतशीरपणे केले जाऊ शकते. यासाठी समाजकार्यांच्या विविध पध्दतींचा एकात्मिक वापरही उपयुक्त ठरतो. अशाप्रकारे काम करतांना सामाजिक कार्यकर्ता व्यावसायिकदृष्ट्या निपुण तर होतोच पण आपली जबाबदारी पार पाडत असतांना देशावर आणि देशातील नागरिकांवर प्रेम करायला शिकतो आणि आपल्यातील पाविर्यिंचे, उदात्ततेचे तसेच माणुसकीचे दर्शन घडते आणि समाजऋणातूनही उतराई होण्याची संधी मिळते.

संदर्भ ग्रंथसुची

1- Goh, Timothy: Toh, Ting Wel, The Straits Times, 24 January, 2020
2- Wikipedia and JHU CSSE COVID-19 Data
3- www.theguardian.com>world>jan
4- Albala Bertrand, J.M. (2004), Natural disaster situations and growth: A macroeconomic model for sudden disaster impact. In H. Kunreuther & A. Rose (Eds.), The economic of natural hazards (pp. 453-470), Cheltenham: Elgar.
5- Barton, A.H. (2005), Disaster and collective stress, In R.W. Perry & E.L. Quarantelli (Eds.), What is a disaster: New answers to old questions (pp. 125-152) Philadelphia: Xlibris
6- Berke, P.R., Recovery after disaster: Achieving sustainable development, mitigation and equity page 93-109
7- चव्हान, ज्ञानेंद्रसिंह और पहावा, एस.के. (२०१३), भारत मे आपदा प्रबंधन, रिसर्च जनरल ऑफ आर्टस, मॅनेजमेंट एंड सोशल सायंसेस.
8- WWW.worldometers.info’ 22 March, 2020